कर्मयोग (कर्माच्या माध्यमातून ईश्वरप्राप्ती) : खंड ३

# पुण्य-पाप यांचे प्रकार आणि परिणाम

मराठी (Marathi)

संकलक

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**पू. संदीप गजानन आळशी**

**सनातन संस्था**


卐 **सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या** 卐

मराठी ३४४, इंग्रजी २०१, कन्नड १९८, हिंदी १९५, गुजराती ६८, तेलुगु ४५, तमिळ ४३, बंगाली २९, मल्ल्याळम् २४, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**फेब्रुवारी २०२४ पर्यंत ३६५ ग्रंथांच्या १३ भाषांत ९५ लाख ९६ सहस्र प्रती प्रसिद्ध !**

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ ‘सनातन संस्थे’ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून २०.३.२०२४ पर्यंत १२७ साधक संत झाले, तर १,०५३ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. आचारधर्मपालन, देवता, साधना, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्ववादी नियतकालिक ‘सनातन प्रभात’चे संस्थापक-संपादक

५. धर्माधिष्ठित अशा हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन!

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !**

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वा ठायी ॥
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ॥ – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

## पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक ‘सनातन प्रभात’मधून प्रबोधनपर लेखनही करतात.

---

## अनुक्रमणिका

**(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)**


**१. कर्माचे परिणाम** ८

१ अ. सुख आणि दुःख  १ आ. संस्कार ८

१ इ. पाप-पुण्य ९

१ ई. माहिती आणि अनुभवजन्य ज्ञान ९

१ उ. अहंभाव किंवा न्यूनगंड ९

**२. पुण्य** ९

२ अ. व्याख्या  २ आ. पुण्य मिळण्याची कारणे ९

२ इ. पूर्वपुण्याईने प्राप्त होणार्‍या गोष्टी १२

२ ई. अपराध्याचे पुण्य बलवत्तर असेपर्यंत तो न सापडणे १३

२ उ. पुण्य न मिळणे १४

२ ऊ. पुण्याचे प्रकार - शुद्ध पुण्य आणि अशुद्ध पुण्य १४

२ ए. खरा पुण्यवान १५

२ ऐ. व्यष्टी पुण्य आणि समष्टी पुण्य यांचा परिणाम १५

२ ओ. पुण्याच्या प्रमाणानुसार प्राप्त होणारा स्वर्गाचा प्रकार १६

२ औ. पुण्य जाळून टाकणाऱ्या गोष्टी १६

२ अं. पुण्य संपल्याची लक्षणे १७

२ क. साधना करून पुण्य वाढवण्याचे महत्त्व १७

२ ख. नामजपाचे पुण्य दुसऱ्याला अर्पिता येणे २०

२ ग. पुण्याचे फळ ईश्वराला अर्पण करण्याचा लाभ २०

२ घ. पुण्यकर्म गुप्त ठेवावे २०

**३. पाप** २१

३ अ. व्याख्या ३ आ. मनुष्याकडून पाप घडणे २१

३ इ. व्यवहारात पाप टाळणे अशक्य असणे २१

३ ई. पापाचे साक्षीदार ३ उ. पापाची कारणे २२

३ ऊ. पापाचे प्रकार ३ ए. पापाचा परिणाम (कर्मविपाक) ३०

३ ऐ. पापाच्या तीव्रतेनुसार मृत्यूनंतरचे भोग आणि मिळणारा जन्म ४६

३ ओ. पापाचा दुसऱ्यावर होणारा परिणाम ६१

卐 प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या ! ६४

卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** ६५

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या ‘सच्चिदानंद परब्रह्म’ या उपाधीविषयी विवेचन !

१३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. त्यापूर्वी त्यांना ग्रंथांमध्ये ‘प.पू.’ आणि ‘परात्पर गुरु’ या उपाध्यांनी संबोधले आहे. यानुसार ग्रंथाच्या मुखपृष्ठावर आणि ग्रंथात तसा तसा उल्लेख केला आहे.

## मनोगत

जीवन कर्ममय आहे. कर्मफळ अटळ आहे. चांगल्या कर्माचे फळ पुण्य देते आणि त्याने सुखप्राप्ती होते, तर वाईट कर्माचे फळ पाप देते अन् त्याने दुःख होते. बर्‍याचदा 'सदाचरणी असूनही सज्जन जीवनात दुःख भोगत आहेत, तर गुंड, भ्रष्टाचारी इत्यादी दुर्जन अनेक दुष्कृत्ये करत असूनही ऐश्वर्यादी सुखे उपभोगत आहेत', असे चित्र आपल्याला दिसते. मग 'दुर्जनांना त्यांच्या पापांचे फळ कसे मिळत नाही', असा प्रश्न कोणाच्याही मनात येऊ शकेल. पूर्वजन्मांतील पुण्याईमुळे दुर्जनांना सुख प्राप्त होते; मात्र पुण्याचा साठा संपल्यावर त्यांना त्यांच्या पापकर्मांची फळे, म्हणजे रोग, दारिद्र्यादी दुःखे आणि मृत्यूनंतर नरकभोगादी दुःखे अवश्यमेव भोगावी लागतात; त्यांपासून कोणाचीच सुटका होत नाही. यास्तव पापांचे परिमार्जन होणे अत्यावश्यकच आहे. दैनंदिन व्यवहारात मनुष्याकडून नकळतपणेही पापकर्मे सतत घडत असतात, उदा. केरसुणीने घर झाडतांना कोळी-कीटकांची हत्या होणे, इतरांचा द्वेष करणे इत्यादी. थोडक्यात, मनुष्याला पाप टाळणे हे केवळ अशक्य आहे. आपण केलेल्या पापांविषयी पश्चात्ताप होऊन पापांचे परिमार्जन करण्यासाठी धर्माने सांगितलेल्या शिक्षा भोगणे, याला 'प्रायश्चित्त' म्हणतात.

प्रस्तूत ग्रंथात पाप लागण्याची व न लागण्याची विविध कारणे, प्रायश्चित्त कर्मे यांसह पुण्य वाढवण्याचे महत्त्व अन् पुण्य निर्माण करणारी कर्मे यांविषयीही सुबोध मार्गदर्शन केले आहे.

हा ग्रंथ वाचून वाचकांना पाप-पुण्याकडे पहाण्याची एक नवी दृष्टी लाभावी अन् पाप-पुण्याच्या पलीकडे जाऊन आनंदप्राप्ती करून घेण्यासाठी सदैव साधना करण्याची प्रेरणा मिळावी, ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**

(सनातनच्या 'कर्मयोग' या मालिकेचे सामाईक मनोगत 'कर्माचे महत्त्व, वैशिष्ट्ये आणि प्रकार' या ग्रंथात दिले आहे.)

**टीप :** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.